http://www.epitomejournals.com, Vol. 3, Issue 7, September 2017, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research

ISSN : 2395-6968

# आंतरिक भक्तीचा उमाळा : संतकवी चोखामेळा



**प्रा. मधुकर बालासाहेब जाधव**

मराठी विभाग,

श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा, जि. बुलडाणा

## ABSTRACT

महाराष्ट्रामध्ये वारकरी, महानुभाव, वीरशैव, दत्त आदी संप्रदाय, धर्मप्रसार व प्रचारासाठी स्थापन झाल्याचे दिसून येते. ज्या संप्रदायाची आचारसंहिता पूरक वाटेल त्या संप्रदायाकडे लोकांचा कल असल्याचे संप्रदाय स्विकत केलेल्या अनुयायांच्या साहित्यावरुन दिसून येते. इतर संप्रदायाच्या तुलनेत वारकरी संप्रदाय काहीसा लोकप्रिय ठरतो कारण सुलभ व सर्वसामान्यांना आपलेसे करणारी आचारसंहिता होय, या संप्रदायातील संत परंपरेमध्ये बहुतांश संतांना भक्तीची, अध्यात्माची परंपरा लाभलेली दिसून येते. भक्ती संस्काराचे बाळकडू अनेक संतांना बालवयातच मिळाल्याचे उल्लेख संतांच्या अभंगात आढळून येतात. या सर्व संतांमध्ये संत चोखामेळा काही अपवाद ठरतात. कारण कुठलीही सांस्कृतिक परंपरा पाठीशी नसताना प्रांजळ भावनेने पांडुरंगाची भक्ती केली व त्या आधारे संत परंपरेत स्वतःचे अढळ असे स्थान निर्माण केले. प्रतिकुल परिस्थिती असतानाही त्यांच्या अंतःकरणातील भक्तीचा उमाळा सतत उचंबळून आल्याचे त्यांच्या विविध भक्तीपर अभंगातून दिसून येते. विविध अभंगाच्या माध्यमातून एक व्यक्ती म्हणून आणि भक्ती क्षेत्रातील श्रेष्ठ संत म्हणून संत चोखोबांचा परिचय करुन घेता येईल.

## KEYWORDS

भक्ती, संतकवी चोखामेळा, महाराष्ट्रामध्ये वारकरी , वारकरी संप्रदाय, भक्ती संस्कार

 *Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-In-Chief ©Eijmr, All Rights Reserved.*

**RESEARCH PAPER**

स्वतःला जगद्‌विलक्षण म्हणजेच मानवाच्या प्रगतीचे आणि सुखाचे रचयिते समजणाऱ्या कर्मठांचा जाच संत चोखामेळांना सहन करावा लागला. समाजाच्या दृष्टिने हीन समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये चोखोबांचा जन्म झाल्यामुळे त्यांना विटाळ–चांडाळ, सोवळा–ओवळा अशा विविध अनिष्ट रुढींचा सामना करावा लागला. परंतु आपली पांडुरंगावरील निष्ठा मात्र त्यांनी तसूभरही ढळू दिली नाही. समाजाच्या सर्वात खालच्या पायरीवर आपल्याला ठेवण्यात आले याचे शल्य त्यांना नेहमी बोचत राहिले. परंतु त्याची अभिव्यक्तीही त्यांनी संयमाने आणि सहनशील वृत्तीने मांडली आहे. आक्रस्ताळेपणा, आकांड–तांडव जी अशा परिस्थितीमध्ये सहज प्रवृत्ती मानली जावी तिला मानवतावादी दृष्टिकोन अंगिकारुन फाटा दिला व भक्ती संप्रदायात धर्म, जात याला फारसे महत्त्व नाही हे पटवून दिले. या सर्व बाबींचा परिपाक म्हणून चोखोबांच्या भक्तीपर अभंगातील आत्मानुभूतीचा स्फूलिंग आजही मानवतावादी वाटेवरचा प्रकाश दिवा ठरतो.

समाजमनाची नैतिक पायाभरणी करणाऱ्या या मानवतावादी संताने हीन याती कुळात जन्मल्यामुळे जे टाक्याचे घाव सोसले त्याविषयीच्या वेदना सौम्य शब्दात तक्रार करुन अभंगरुपाने मांडल्या आहेत.

हीन माझी याती देवा । कैसे घडे तुमची सेवा ।।
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्यारीती ।।
माझा लागताची कर । सिंतोडा घेताती करार ।।
माझ्या गोविंदा गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ।।

आपल्याला लोक अस्पृश्य समजतात, कोणी जवळ करीत नाही. अंगाला स्पर्श झाल्यास स्नान करतात. अशा विविध प्रकारच्या दुःखाची, वेदनेची जाणीव संत चोखामेळा व्यक्त करतात. या जाचातून विठ्ठलाने आपणास मुक्त करावे, अशी करुणाही ते भाकतात. परंतु शत्रुबुध्दी ठेवून त्रास देणारांविरुध्द शत्रुबुध्दीने त्रागा मात्र करीत नाहीत. नैतिक अधिष्ठान असलेल्या संत चोखोबांबद्दल भालचंद्र नेमाडे 'श्री संत चोखामेळा चरित्र आणि अभंग' या संपादित ग्रंथाच्या प्रस्तावनेत गौरवोद्‌गार काढताना नमूद करतात की, ''दूर हो दूर हो असे म्हणणाऱ्या वारकऱ्यांचा तो मनःशांती ढळू न देता उल्लेख करतो. दारिद्र्य, आरोप, आळ, अवहेलना, छळ, शिक्षा हे सगळे संयमाने व्यक्त करताना त्याने आपली थोर नैतिकता किंचितही ढळू दिली नाही.'' पांडुरंगावरील निष्ठेमुळे चोखोबा असह्य ठरु पाहणाऱ्या वेदनांना वरचढ होऊ देत नाही अथवा त्रासाला कंटाळून भक्ती मार्गापासून पळवाटही काढत नाही. ध्येयाप्रति या संतकवीची तादात्म्यता व इतरांप्रति असलेले औदार्य मान्य करावे लागते.

मनुष्य हा जन्माने नव्हे तर कर्माने श्रेष्ठ ठरावा असे प्रतिपादन करुन संत चोखामेळा जात, पंथ, वर्ण या गर्तेत अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याचे महनीय कार्य नकळत करुन जातात. स्वातंत्र्य, अधिकार नाकारणाऱ्या समाजाला चोखोबा पांडुरंगाप्रति असलेला भक्तिभाव या वारंवार पटवून देतात. विठ्ठलाला स्पर्श करण्यापासून परावृत्त करणाऱ्या मंदिरात प्रवेश करण्यापासून वंचित ठेवणाऱ्या व समाजासमोर आपल्या प्रामाणिक भक्तीचा आदर्श ठेवताना चोखोबा....

''चोखामेळा तेथे वंदितो चरण । घाली लोटांगण महाद्वारी ।।''

यातही समाधान मानतो. पाप–पुण्याची व्याख्या समजून सांगणाऱ्या व विद्वत्तेची प्रौढी मिरविणाऱ्या धर्म मार्तंडांनी 'महाद्वाराच्या पायरीशी' पांडुरंगाच्या एका निस्सीम भक्ताला थोपविण्याचे पातक करावे अन त्यास प्रत्युत्तर म्हणून चोखोबांनी महाद्वाराजवळ पांडुरंगाची करुणा भाकावी यावरुन त्यांच्यात दडलेल्या शांतीदुताचा प्रत्यय येतो.

हीन यातीमध्ये जन्म घेतल्यामुळे झालेली कुचंबना, स्पृश्या–स्पृश्यतेच्या चक्रव्युहात होत असलेली जीवघेणी पिळवणूक संत चोखामेळा भक्तीत अडसर ठरु देत नाही. कारण आपल्या ध्येयाप्रति असलेली त्यांची प्रचंड आसक्ती त्यांना भक्क्म बळ प्राप्त करुन देते आणि भक्तीच्या सागरात तारुन नेण्यास सहायभूत ठरते. एव्हाना ती त्यांच्या अभंगातून जाणवतेसुध्दा.

''कोण तो सोवळा कोण तो वोवळा । दोहीच्या वेगळा विठ्ठल माझा ।।''

सोवळे–ओवळे अमान्य करताना संत चोखोबा म्हणतात माझा 'विठू' दोहोंच्याही पेक्षा वेगळा आहे. सोबतच सोवळ्या ओवळ्याचे बंड माजविणाऱ्यांना ते समज देतात की सोवळा–ओवळा, विटाळ–चांडाळ यात विठ्ठलास बंदिस्त करता येऊ शकत नाही. यासंदर्भात डॉ. मु.श्री. कानडे म्हणतात ''समाजातील सामान्यजन सोवळ्या–ओवळ्याचे प्रस्थ माजवित असले तरी पंढरीचा विठ्ठल त्यात गुरफटलेला नाही.''

आपल्या बहुतेक अभंगांतून दलितांवर झालेल्या सामाजिक अन्यायाची बोच चोखोबांनी व्यक्त केली आहे. सामाजिक उपेक्षेची अंतरीची वेदना समष्टीच्या भावाने मांडण्याचा पहिला प्रयत्न चोखोबांच्या रुपाने दिसून येतो. हीन यातीचा प्रतिनिधी आणि विठ्ठलभक्त अशा दुहेरी भूमिका वठविताना संत चोखामेळांना दिव्यातून जावे लागते. विठ्ठलसेवेत जीवनाचे सार्थक मानणारे चोखोबा ''चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा । काय भूललासी वरलिया रंगा ।।'' या अभंगातून आपल्याला आपल्या जातीमुळे ईश्वरसेवेपासून वंचित ठेवू नये असे सूचवितात. शुध्दता, पावित्र्य याबाबतीत आपला भक्तिभाव निःसंशय श्रेष्ठ असल्याचे आश्वासनही चोखोबा देतात. त्यांच्या या आश्वासनाचे समर्थन करताना डॉ. मु. श्री. कानडे म्हणतात ''आपली याती समाजव्यवहारात हीन गणली जात असली तरी अंतःकरणातील भाव हीन नाही असे त्याने मोठ्या आग्रहपूर्वक बजाविले आहे.''

आपल्या काव्यवाणीच्या बळावर विरोधकांनाही दखल घ्यावयास भाग पाडणारे चोखोबा पारमार्थिक तळमळीने ओथंबलेली रचना करतात. समाजव्यवस्थेने नाकारलेल्या शिक्षणाधिकाराचे भांडवल न करता मोक्ष मिळवायचा असेल तर बावनकशी भक्तिभाव पुरेसा आहे. त्यासाठी शास्त्राभ्यासाची गरज नाही, असे धाडसी वक्तव्य करतात. त्याची प्रचिती खालील अभंगाव्दारे येते.

> ''आम्हा न कळे ज्ञान न कळे पुराण । वेदांचे वचन न कळे आम्हा ।।
> आगमाची आठी निगमाचा भेद । शास्त्रांचा संवाद न कळे आम्हा ।।
> योग याग तप अष्टांग साधन । न कळेचि दान व्रत तप ।
> चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा । गाईन केशवा नाम तुझे ।।

वेद, उपनिषदे यांची जाण नसलेले जन्म–मृत्यु यांच्याबद्दल शास्त्रोक्त माहिती नसलेले, शास्त्र, योग, यज्ञ यांच्याशी कसलाही संबंध नसलेले संत चोखोबा केवळ देवभोळ्या वृत्तीने समाजामध्ये वावरतात आणि केशवाच्या नामस्मरणातून अध्यात्मिक उंची गाठतात. स्वतःला निरक्षर, अज्ञानी समजणाऱ्या भोळ्या विठ्ठलभक्तांना धीर देण्याचे व त्यांच्यातील द्वैत संपविण्याचे कार्य चोखामेळा यांनी आपल्या अभंगाद्वारे सहजगत्या साधले आहे. विठ्ठलभक्तांसाठी यापेक्षा मोठा आदर्श आणखी काय ठरावा?

आंतरिक भक्तीच्या बळावर जात–धर्माच्या मर्यादा ओलांडून संत मंडळामध्ये स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या संत चोखामेळांची भक्ती आजही त्यांचे स्थान कायम ठेवून आहे.

## संदर्भ

1) कदम, सं. भा. (संपा.), 'श्री संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

2) नेमाडे, भालचंद्र, प्रस्तावना, 'श्री संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग', कदम, सं. भा.–(संपा.), शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

3) माटे श्री. म., 'संत, पंत आणि तंत', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

4) झेलिएट, एलिनॉर आणि मंजुळ वा. ल. संपा. 'संत चोखामेळा : विविध दर्शन'

5) कानडे मु.श्री., 'संतांची हे भेटी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

6) नासिराबादकर, ल.रा., 'प्राचीन वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर